ग्राम विद्युत व्यवस्थापक पदाच्या
निवडीबाबतच्या भौगोलिक निकषाबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.८/पं.रा.३
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: १९ ऑगस्ट, २०१९

वाचा :

शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.८/पं.रा.-३, दिनांक २० ऑक्टोबर, २०१६

शासन शुद्धीपत्रक :

राज्यातील ३००० लोकसंख्या पर्यंतच्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण भागामध्ये महावितरण कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या काही सेवा ग्रामपंचायतींनी "फ्रॅन्चाईझी" म्हणून काम करणेबाबत शासनाने निर्णय घेतला असून याबाबतचा शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोंबर, २०१६ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयातील नमूद कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत उपयुक्त व क्षमताधारण करणाऱ्या व्यक्तींची एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात येणार असून त्या व्यक्तीला ग्राम विद्युत व्यवस्थापक या नावाने संबोधण्यात येणार आहे. "ग्राम विद्युत व्यवस्थापक" या पदासाठी निवड करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निकष निश्चित केले आहेत.

१. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींमधून दिनांक २० ऑक्टोंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद अर्हता धारण करणारी व्यक्ती ग्राम विद्युत व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्यासाठी पात्र राहील.
२. यासाठी इच्छूक व अर्हता धारण करणारी व्यक्ती एखाद्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध होऊ शकली नाही तर ५ कि.मी. परिसरातील इतर ग्रामपंचायत क्षेत्रातील व्यक्ती ग्राम विद्युत व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्याकरिता निवडीसाठी पात्र राहील.
३. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ५ कि.मी. परिसरातील इच्छूक व अर्हता धारण करणारी व्यक्ती उपलब्ध होऊ शकली नाही तर, महावितरणने राज्यामध्ये नेमलेल्या "फ्रॅन्चाईझी" कंपनीमध्ये एकूण ५ वर्ष काम करणारा कंत्राटी कामगार हा ग्राम विद्युत व्यवस्थापक करिता त्या-त्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात अर्ज करण्यास पात्र राहील.

वरील निकषानंतर खालीलप्रमाणे निकष समाविष्ट करण्यात येत आहे.

४. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ५ कि.मी. परिसरामध्ये सुध्दा ग्राम विद्युत व्यवस्थापक पदासाठी इच्छूक व अर्हताधारी व्यक्ती उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे; पर्यायाने ग्राम विद्युत व्यवस्थापकाची पदे रिक्त राहिली आहेत. यास्तव वर नमूद केलेल्या ३

निकषानुसार पात्रताधारक उमेदवार उपलब्ध होऊ शकला नाही तर ५ कि.मी. परिसराबाहेरचा त्या जिल्ह्यातील इच्छूक उमेदवार निवडीसाठी पात्र राहतील.

०२. सदर शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २०६, दि. १५/०२/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४१५१९३१८०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.08.20 14:32:37 +05'30'

(असीम गुप्ता)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (उर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व सन्माननीय विधान परिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१४. उर्जा विभागातील सर्व कार्यासने
१५. निवड नस्ती (कार्यासन पं.रा-३).